# प्रकरण - चौथे

## मूल्यमापन

# प्रकरण - चौथे
# मूल्यमापन

लोकशाहीचा विकास होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व अनन्य साधारण आहे. नागरीकरणाच्या अगोदरच्या काळात नागरी वस्तीच्या कामाचे स्वरूप केवळ ''किमान नागरी सेवा पुरविणारी, तसेच रस्ते आणि दिवाबत्ती पुरविणारी संस्था'' असेच होते. जसे राज्याचे स्वरूप बदलले तसेच स्थानिक शासनाच्या कार्याचे स्वरूपही बदलले. स्थानिक शासनाकडून चांगल्या जीवनाबाबतच्या अधिकाधिक चांगल्या सेवा व कार्याची अपेक्षा नागरिकांची असते. विकसनशील देशांमध्ये कल्याणकारी योजना राबविताना सर्वच देशांमध्ये स्थानिक शासनाचा सहभाग आवश्यक बनत आहे. त्यामुळे स्थानिक शासन विकास प्रक्रियेमधील सहकारी भूमिका जनतेला अपेक्षित आहे. सन १९९३ मध्ये झालेल्या ७३ व्या व ७४ व्या भारतीय घटनादुरूस्ती अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थेला संविधानिक दर्जा प्राप्त झाला.

भारतीय राज्यघटनेमधील बाराव्या परिशिष्टामध्ये नगरपरिषद कार्ये नमूद केली आहेत. 'लोकांना सत्ता' आणि 'सहभागी लोकशाही' या संकल्पनांना खराखुरा न्याय ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीने मिळवून दिला. एका अर्थाने गांधीजींचे 'ग्रामराज्य' हे स्वप्न साकार करण्यासाठी यथायोग्य दिशेने वाटचाल सुरू झाली.

पंढरपूर नगरपालिकेची स्थापना ब्रिटिश राजवटीत १२ ऑक्टोबर १८५५ मध्ये झाली. त्या अगोदर महाराष्ट्रात केवळ १३ नगरपालिका कार्यरत होत्या. महाराष्ट्रातील नगरपालिकेचे कार्य 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' नुसार सिमीत करण्यात आले आहे. पंढरपूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र असल्याने लोकसंख्येत व नागरीकरण

यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण होऊन जागेचा प्रश्न, पाणीप्रश्न व अस्वच्छतेचे प्रश्न निर्माण झाले आहेत. पंढरपूर हे प्राचीन धार्मिक तीर्थक्षेत्र असल्या कारणाने शहराच्या विकासासाठी व जनतेला सोयी सुविधा पुरविण्यासाठी पंढरपूर नगरपालिकेने प्रथमपासून लक्ष दिले आहे.

पंढरपूर नगरपालिकेने पाणीपुरवठा, सार्वजनिक सुरक्षितता, रस्त्यावरील दिवाबत्ती, शहराची साफसफाई व सोयी, आरोग्य विषयक सोयी, सार्वजनिक उद्यान, शिक्षणविषयक कामे, यात्राकाळात भाविकांना सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी विविध स्वरूपाची कामे केली आहेत. पंढरपूर हे महाराष्ट्रातील एक अत्यंत पवित्र व धार्मिक तीर्थक्षेत्र असून 'दक्षिणकाशी' म्हणून पंढरपूरला ओळखले जाते. सन १९७४ मध्ये पंढरपूर नगरपालिकेने रू. २,१६,१४०/- खर्च करून यमाई तळे निर्माण केले. या तळ्याची पाणी साठवणूक क्षमता ८,९३,३०,०५८ घ.मी. इतकी आहे. पंढरपूर शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे पाणीपुरवठा योजनेत वेळोवेळी सुधारणा करण्यात आली. सन १९७६ साली मंजुर करण्यात आलेल्या योजनेत जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आले. त्यानंतर मनिषानगर, शिवाजी चौक, पद्मावती गार्डन, अनिलनगर इत्यादी ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या आहेत. पंढरपूर नगरपालिका पाणीपुरवठा विभागामार्फत पाणी पुरवठा केंद्राकडून उपलब्ध करून दिलेले शुद्ध पिण्याचे पाणी नागरिकांना पिण्यासाठी पुरेशा प्रमाणात व योग्यरित्या वितरण केले जात आहे. पाणीपुरवठा विभागाअंतर्गत अग्निशमन कार्यरत असते. अग्निशमनासाठी ३००० लिटर क्षमतेचा स्वतंत्र अग्निशामक असून शहरात कोठेही आगीची दुर्घटना घडल्यास तातडीने घटनास्थळी पोहचण्यासाठी अग्निशामक यंत्रणा २४ तास सज्ज असते.

पंढरपूर नगरपालिका आरोग्य विभागामार्फत नागरिकांना व यात्रेकरूंना अनेक सोयी पुरविल्या जातात. आरोग्याधिकारी हे आरोग्य विभागाचे प्रमुख असून

आरोग्य विभागामार्फत शहरातील सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य सुस्थितीत राखण्याचे महत्त्वपूर्ण काम केले जाते. शहर उपनगरातील रस्ते, गटारी, नाले, ड्रेनेज लाईन, सेप्टीक टँक इत्यादीची स्वच्छता व साफसफाईचे काम सफाई कामगार व सुपरव्हिजन स्टाफ यांच्या मार्फत करून घेतले जाते. आरोग्यधिकारी हे जन्म-मृत्यू निबंधक म्हणून काम पहात असतात. पंढरपूर शहरामध्ये वर्षातून चार मोठ्या यात्रा भरत असतात. या यात्रा झाल्यानंतर पंढरपूर शहरातील प्रत्येक घरातील २ किंवा ३ माणसे आजारी पडतात. संपूर्ण पंढरपूर शहरात दुर्गंधी व रोगराई पसरते. याचा प्रत्यक्ष परिणाम शहरातील नागरिकांच्या जनजीवनावर पडत असतो. कॉलरा, हिवताप, गोवर, कांजण्या, विषमज्वर, श्वसन रोग, मलेरिया, डोळे येणे, न्यूमोनिया, क्षयरोग इत्यादी अनेक रोगांची लागण होते. या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी पंढरपूर नगरपालिकेने विविध योजना राबविलेल्या आहेत.

हिवताप, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया इत्यादी रोग हे डासांच्या उत्पत्तीमुळे होतात. डास उत्पत्ती प्रतिबंधक फवारणी संपूर्ण शहरामध्ये केली जाते. डास उत्पत्ती होवू नये म्हणून नागरिकांना वेळोवेळी दक्षता घ्यावयाच्या सूचना जाहीर पत्रकाद्वारे दिल्या जातात. पंढरपूर नगरपालिकेचा एक दवाखाना आहे. या दवाखान्यामध्ये मुख्य इमारत, कोरोनेशन दवाखाना, कुटुंबकल्याण केंद्र व आर्युवेदिक दवाखाना हे विभाग कार्यरत आहेत. यात्रा कालावधीत तसेच साथीच्या रोगाच्या वेळी १०० खाटांचे संसर्गजन्य रूग्णालय आहे. यात्रा कालावधीत शहरात महत्त्वाच्या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र उभारली जातात.

पंढरपूर शहर विशेष विकास आराखडा अंतर्गत जानेवारी १९९१ साली मंजुर झालेल्या योजनेअंतर्गत 'ड्रेनेज डिस्ट्रीक्ट' १ व २ मध्ये काही भागांचा समावेश होतो. स्वच्छता योजनेअंतर्गत एकूण २३ कि.मी. लांबीची आर.सी.सी.

पाईप लाईन शहरात टाकण्यात आली आहे. पंढरपूर नगरपालिकेमार्फत घरगुती ड्रेनेज जोडणीचे काम प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात आले आहे. गोपाळपूर येथे ६.५० दशलक्ष लिटर क्षमतेचे मलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आले आहे.

पंढरपूर नगरपालिकेने शैक्षणिक कार्यातही भरीव कामगिरी केली आहे. पंढरपूर नगरपालिकेने शिक्षणाचे महत्त्व जाणून घेऊन पंढरपूर शहरात प्राथमिक, माध्यमिक व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सोय करून दिली आहे. लोकमान्य विद्यालय ही पंढरपूर शहरातील सर्वात जुनी व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली व शैक्षणिक गुणवत्ता कायम जोपासणारी अशी शिक्षण संस्था म्हणून ओळखली जाते. पंढरपूर शहरातील विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षणाची सोय नगरपालिकेने केली आहे. पंढरपूर शहरामध्ये ६ ऑगस्ट १९८४ मध्ये महाराष्ट्र सरकारच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेत विविध व्यवसायाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते.

पंढरपूरमध्ये वर्षातून आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या चार यात्रा आणि आठ मासिक वाऱ्या भरत असतात. त्यामध्ये लाखो भाविक पंढरपूरला येतात. जास्त लोकसंख्येमुळे शौचालयाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. भाविकांची गैरसोय होऊ नये, म्हणून शहरातील विविध भागात सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली आहेत. यात्रा काळात व यात्रेनंतर शहर स्वच्छ करण्याचे काम नगरपालिका करीत असते.

नवीन घरे बांधताना शौचालय बांधणे हे नगरपालिकेने सक्तीचे केले आहे. शहरातील सर्व सांडपाणी गोपाळपूर येथील लेंडकी नाल्यात सोडून त्यापासून कंपोस्ट खत बनविण्यासाठी मैलाचा वापर केला जातो.

पंढरपूर शहरामध्ये सर्वत्र रस्त्यांची कामे नगरपालिकेने केली आहे. प्रत्येक गल्ली-गल्लीत रस्ता डांबरीकरण केले आहे. पंढरपूर नगरपालिकेने शहरात

वाचनालयाची सोय केली आहे. पंढरपूर शहरात नगरपालिका अंतर्गत २ वाचनालये आहेत. या वाचनालयात विविध प्रकारची मासिके, वृत्तपत्रे, ग्रंथ, कांदबऱ्या इत्यादी साहित्य उपलब्ध करून दिले आहे. पंढरपूर नगरपालिकेने शहरातील विविध भागात शॉपिंग सेंटरची निर्मिती केली आहे. या शॉपिंग सेंटरमुळे नागरिकांना व्यवसायाची व रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

पंढरपूर नगरपालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी दोन भाजी मार्केटची स्थापना केली आहे. भाजी विक्रेत्यांना जागा उपलब्ध करून दिलेली आहे. पंढरपूर शहरात दोन मटण मार्केट व एक कत्तलखाना आहे. आरोग्य अधिकारी वेळोवेळी कत्तलखान्याची पाहणी करीत असतात. पंढरपूर नगरपालिकेमार्फत शहरातील व उपनगरातील नागरिकांसाठी जिजामाता व पद्‌मावती उद्यान विकसित केले आहे. उद्यानामध्ये विविध प्रकारची आकर्षक खेळणी, फुलझाडे, विविध प्रकारची रोपे, आकर्षक लॉन, सुंदर कारंजे, विजेवर चालणारी रेल्वे गाडी इ. साहित्याची सोय पंढरपूर नगरपालिकेने केली आहे. अशा अनेक सोयी-सुविधा पंढरपूर नगरपालिकेने नागरिकांना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पंढरपूर नगरपालिकेने शहराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावलेली आपणास दिसून येते.

**सामाजिक समस्या :**

पंढरपूर हे केवळ धार्मिक स्थळ म्हणून पाहिले जाते. आज पंढरपूर शहरात विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत. पंढरपूर नगरपालिकेलाही सामाजिक सुविधा पुरविण्यात अपयश आले आहे. पंढरपूर नगरपालिकेने नव्या पेठेमधील गोरगरिब लोकांची खोकी काढून त्याठिकाणी शॉपिंग सेंटर केले जाणार म्हणून लोकांना विस्थापित केले. मात्र अद्यापही त्या कामाचे भूमिपूजनही करण्यात आले नाही. एखाद्या गावात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाण्याची टाकी बांधते, तिच्या पाण्याचा दर व पंढरपूर नगरपालिकेच्या माध्यमातून बांधण्यात येणाऱ्या पाण्याच्या

टाकीच्या पाण्याचा दर यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक पडत आहे. पंढरपूर शहराचा विकास करण्यासाठी सिडकोने प्रस्ताव दिला होता परंतु हा प्रस्ताव नगरपालिकेने मान्य केला नाही. नगरपालिकेने हा प्रस्ताव फेटाळून शहराचा विकास होण्यापासून एक प्रकारे अडथळाच आणलेला आहे. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील मोठ-मोठे उद्योजक पंढरपूरच्या विकासासाठी लाखो रूपये देण्यास तयार आहेत. परंतु नगरपालिकेचे त्याकडे दुर्लक्ष आहे. आज आपल्याला सामाजिक बांधिलकीचा अभाव दिसून येतो. समाजप्रबोधनाची प्रक्रिया विकासकामातून घडावी अशी अपेक्षा नागरिकांकडून व भाविकाकडून व्यक्त होत आहे. हजारो वर्षापूर्वी ऐतिहासिक वास्तू या ज्ञाननिर्मितीच्याच वास्तू म्हणून अस्तित्वात आलेल्या आहेत. काळाच्या ओघात हा ज्ञाननिर्मितीचा भाव मागे पडून नको त्या बाबींना महत्त्व प्राप्त होऊ लागले आहे. विख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. विजय भटकर व प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे या अर्थानेच तीर्थक्षेत्रांना 'ज्ञानतीर्थक्षेत्रा' मध्ये रूपांतरण करण्याचा आग्रह अग्रक्रमाने धरत आहेत.

पंढरपूर शहरामधील अनेक रस्त्यांचे डांबरीकरण सातत्याने उखडण्यात येते. या रस्त्यावरून दररोज प्रवासी व भाविक ये-जा करीत असतात. प्रदक्षिणा रस्त्यांचे २.२५ कि.मी. अंतराचे डांबरीकरण सातत्याने खराब होते. प्रत्येक एकादशीला भाविक अनवाणी पायाने या रस्त्यावरून नगरप्रदक्षिणा करीत असतात. पंढरपूर शहरात स्टेशन रोड, सावरकर पुतळा, बस स्थानक, शिवाजी चौक आदी भागातील रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना असणारी दुकाने, उभी वाहने व अगदी रस्त्यावरच बसलेले किरकोळ विक्रेते यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होते. पंढरपूर शहरातील सर्व रस्ते अरूंद स्वरूपाचे आहेत. शहरातील सर्व फूटपाथ रस्त्यांना गाळेधारक विक्रेत्यांनी व्यापले आहे. त्यामुळे पायी चालणारे व वाहने यामुळे रस्त्यांची कोंडी निर्माण होऊन अपघाताचे प्रमाण वाढले आहे. तसेच

शहरामधील क्रांतीसिंह नाना पाटील चौक, सरगम चौक, बसस्थानक परिसर, नवीन पुल, महात्मा फुले पुतळा, टाकळी रोड, जुनी पेठ इ. भागातील रस्ते उद्ध्वस्त झाल्याचे चित्र दिसत आहे. पंढरपूर शहरात रस्त्याबरोबरच पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात नागरिकांची व भाविकांची गैरसोय होत असलेली दिसून येते. शहरातील उपलब्ध असलेल्या पाणपोईपैकी एकही पाणपोई सुरू नाही. शहराच्या मधोमध असलेल्या शिवाजी चौकातील पाणपोई अतिक्रमणात काढून टाकली आहेत. त्यामुळे नागरिकांची व भाविकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. पंढरपूर शहरातील काही वार्डात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, गटारीचा प्रश्न, रस्त्यांचा प्रश्न इ. प्रश्न शहरवासियांना भेडसावत आहेत. सोलापूर रोड कडे जाणाऱ्या रस्त्यावर रेल्वे प्रशासनाने एक ब्रिज बांधला आहे. या ब्रिजच्या खाली कायमस्वरूपी पाणी साठलेले असते. या पाण्यात शेजारील परिसरातील गटारीचे पाणी मिसळले जात असल्यामुळे या परिसरात आरोग्याच्या तक्रारी वाढलेल्या आहेत. परिसरांत राहणाऱ्या नागरिकांना डासांच्या उत्पत्तीमुळे अनेक रोगांची लागण झालेली आहे. नागरिकांना हिवताप, मलेरिया, डेंग्यू यासारख्या रोगांची लागण होते. या परिसराकडे नगरपालिकेच्या आरोग्य खात्याचे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याचे मत नागरिकाकडून व्यक्त होत आहे. या रोगांमुळे शहरातील काही व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे.

पंढरपूर शहरात कुत्रे, डुक्कर, जनावरे इ. मोकाट जनावरांचा सुळसुळाट असलेला दिसून येतो. पंढरपूर शहरात परिसरातील रस्त्यांच्या बाजूने उघडी गटारे आहेत. शहरात पुरूषांसाठी काही ठिकाणी सार्वजनिक मुताऱ्यांची सोय आहे. परंतु स्त्रियांसाठी सार्वजनिक मुताऱ्यांची सोय उपलब्ध नाही. पंढरपूरमध्ये यात्राकाळात लाखो भाविक येतात परंतु त्यांच्या वाहनासाठी नगरपालिकेने पार्किंगची सोय केलेली नाही. यात्रा काळात चंद्रभागेच्या वाळवंटात सर्वत्र वाहने असलेली दिसून येतात. पंढरपूर शहराच्या लोकसंख्येत व नागरिकरणात

दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जागेचा प्रश्न, पाणीप्रश्न, स्वच्छतेचे प्रश्न निर्माण झाले आहेत. पंढरपूरमध्ये जुन्या इमारती मोठ्या प्रमाणात आहेत. या इमारती केव्हांही कोसळू शकतात. पंढरपूर शहरातील पुतळ्यांची निगा पाहिजे त्या प्रमाणात राखली जात नाही. पंढरपूर शहरामधील यात्राकाळात शेकडो टन केरकचरा पडलेला दिसतो हा केरकचरा उचलण्यासाठी मोठ्या प्रमाणात सफाई कामगार वर्गाची कमतरता भासते. परिणामी नगरपालिकेला स्वच्छता करण्यास अपयश येते. शहरामध्ये वाहतुकीसाठी सिटी बसची सोय नाही. पंढरपूर शहरात एकच बसस्थानक आहे व तेही शहराच्या मध्यभागी असल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. पंढरपूर शहराचा विस्तार वाढत चालला आहे. पंढरपूर शहर उपनगराची झपाट्याने वाढ होत आहे. या हद्दवाढ भागाचा कोणताही विकास न करता नगरपालिका यात्रा कर गोळा करण्याचे काम करीत आहे. पंढरपूर हे शहर चंद्रभागा नदीच्या काठावर वसले आहे. प्रत्येक वर्षी चंद्रभागा नदीला आलेल्या महापुरामुळे पंढरपूर शहर १५ ते २० दिवस पाण्याखाली असते. या महापुरामुळे पंढरपूरचे जनजीवन विस्कळीत होते. नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो. अनेक साथीचे रोग येतात. तसेच पंढरपूरमध्ये पावसाचे सरासरी प्रमाण कमी असल्यामुळे उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण होते.

**पर्यावरण विषयक व आरोग्य विषयक समस्या :**

पंढरपूरमध्ये लाखो वारकऱ्यांचा समुदाय विठ्ठलाच्या दर्शनासाठी येतात. चंद्रभागेच्या पाण्यात बुडून पवित्र होण्यासाठी भाविक स्नान करीत असतात. यामुळे शहरातील पायाभूत सोयीवर कमालीचा ताण पडत असतो. नगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा पुरेशा ठरत नसल्यामुळे शहरातील अनेक रस्त्यांचे, चंद्रभागेच्या वाळवंटाचे रूपांतरण प्रत्यक्षात शौचालया सारखे झाले आहे. पंढरपूर शहरात काही भागात उघडी गटारे आहेत. गोपाळपूर परिसरातील अनेक

कुपनलिकांमधील पाणी पायलट प्रकल्पामुळे दूषित झाल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण होते. याला कोणतेही लोकनियंत्रित वा शासन नियंत्रित प्रशासन नियंत्रण करू शकत नाही. पर्यायाने पंढरपूर शहराचे पर्यावरण कोलमडून पडते. शेकडो वर्षापासून पंढरपूर शहरात पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. त्यामुळे पंढरपूर शहरातील प्रदूषित वातावरण अनेक रोगराईला जन्म देते. नदीचे पाणी प्रदूषित होते. नदीतील जलचर प्राणीमात्रांचे आरोग्य धोक्यात येते. तसेच पंढरपूर शहरवासियांचेही आरोग्य बिघडविते. पंढरपूर शहरात एक यमाई तलाव आहे. या तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. या तलावात धुणी-भांडी, जनावरे धुतली जातात. त्यामुळे यमाई तलावाचे पाणी प्रदूषित होते. या तलावाच्या सभोवताली घाणीचे साम्राज्य वाढलेले आहे.

पंढरपूर नगरपालिकेच्या अंतर्गत संसर्गजन्य रूग्णालय आहे. या रूग्णालयामध्ये अनेक सोयीची कमतरता असलेली दिसून येते. यामध्ये रक्त व लघवी तपासण्याची सोय नाही. या रूग्णालयामध्ये असलेल्या सर्व मशिनरी धुळ खात पडल्या आहेत. योग्य प्रकारची मशिनरी उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात रूग्णांची गैरसोय होते. संसर्गजन्य रूग्णालयाची जागा ही पोष्ट मार्टम करणाऱ्या जागेच्या जवळ आहे.

**प्रशासकीय समस्या :**

पंढरपूर नगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या प्रशासन वर्गात अकार्यक्षमता असलेली दिसून येते. कर्चमारी वर्ग कार्यालयीन वेळेत कामावर गैरहजर असल्याचे दिसून येते. नगरपालिकेमधील कर्मचारीवर्ग आपल्या कामात बेजबाबदार, हलगर्जीपणा व दप्तरदिरंगाई असल्याचे दिसून येते. यात्राकाळामध्ये मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गावर कामाचा ताण पडतो. यात्राकाळामध्ये नगरपालिकेकडे कामगार वर्गाची कमतरता भासते. प्रशिक्षित

कामगार वर्गाचा अभाव असल्याचे दिसून येते. कामगारांची भरती करताना स्थानिक पुढाऱ्यांनी आपल्या जवळच्या लोकांची भरती केलेली दिसून येते. संगणक प्रशिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या फार कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते.

**राजकीय समस्या :**

स्थानिक राजकीय नेत्यांमध्ये इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे दिसून येते. पंढरपूर नगरपालिकेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व असलेले दिसून येते. पंढरपूरच्या पुनर्वसनाबाबत दोन वर्षापासून आमदारांनी चार वेळा पत्रे दिली, एक वेळ समक्ष भेट घेतली आणि पुनर्वसनाबाबत पाठपुरावा केला तर ते काम केवळ ही राष्ट्रवादीची नगरपालिका आहे म्हणून हे काम केले नाही. पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र असल्यामुळे शहरात अस्वच्छतेचा गंभीर प्रश्न उभा राहिलेला आहे. याबात शासनाने व नगरपालिकेने भरीव असे कार्य केले नाही. पंढरपूर शहरामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, भाजप, शिवसेना, रिपाई, मनसे, बसपा, जनसुराज्य इ. राजकीय पक्ष पहावयास मिळतात. वरील विविध पक्षामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सर्वात सामर्थ्यशाली आहे. याच पक्षाची पंढरपूर नगरपालिकेवर सत्ता आहे. नगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात पक्षीय राजकारण आढळून येते. सत्ताधारी पक्ष विरोधी नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये विकासकामात अडथळा आणण्याचा प्रयत्न करतात. शहराचा विकास करताना राजकीय पक्षाचे एकमत होताना दिसत नाही. त्यामुळे शहराचा विकास करताना राजकीय पक्षांचे एकमत होताना दिसत नाही. त्यामुळे शहराचा विकास पाहिजे तेवढ्या प्रमाणात झालेला नाही. शासनाचेही या तीर्थक्षेत्राकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र असल्यामुळे पंढरपूरला अनेक मंत्री भेट देतात. त्यांच्या येण्या-जाण्यावर व त्यांच्या सुरक्षिततेवर लाखो रूपयांचा खर्च होतो. त्यामुळे पंढरपूरच्या सुरक्षा यंत्रणेवर मोठ्या प्रमाणात ताण पडलेला दिसून येतो.

**उपाययोजना :**

१) महाराष्ट्राबाहेरील मोठ-मोठे उद्योजक पंढरपूरच्या विकासासाठी लाखो रूपये देण्यास तयार आहेत. परंतू त्यांच्यासमोर पंढरपूर विकासाचा ठोस कार्यक्रम/ आराखडा ठेवणे गरजेचे आहे.

२) शहरातील प्रमुख रस्त्यांचे चौपदरीकरण करण्यात यावे.

३) शहरातील सर्व गटारे बंदिस्त स्वरूपाची करावीत.

४) नगरपालिकेच्या मालकीची जी जमीन आहे त्या जमिनीवरील बाभळीच्या झाडांची विल्हेवाट लावून त्या जागी यात्रेकरूंना विविध सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

५) पंढरपूर शहरामध्ये सिटी बस असावी त्यासाठी पंढरपूर नगरपालिकेने पुढाकार घ्यावा.

६) चंद्रभागा नदीचे सौंदर्य टिकविण्यासाठी वाळू उपसा बंद केला पाहिजे.

७) पंढरपूर शहराच्या विकासाचे नियोजन ठरविताना ते भविष्याची दृष्टी समोर ठेवून नियोजन करावे.

८) पंढरपूर शहरातील रस्त्यांची साफसफाईची चोख व्यवस्था करावी.

९) चंद्रभागा वाळवंटातील परिसर स्वच्छ ठेवावा. त्या ठिकाणी गुरे व वाहने धुण्यास परवानगी देऊ नये.

१०) पंढरपूर शहरातील विविध ठिकाणी स्वतंत्र सुलभ शौचालये असावीत.

११) यात्रेकरूंना राहण्यासाठी स्वतंत्र भक्त निवासाची सोय असावी.

१२) पिण्याच्या स्वच्छ पाण्याची योग्य व्यवस्था करण्यासाठी आधुनिक वॉटर फिल्टरेशन असावे.

१३) पंढरपूर शहराचा विकास करताना रस्ते रूंदीकरण, सुशोभिकरण, वाळवंटाची स्वच्छता, शौचालय, इ. बाबींकडे प्रामुख्याने लक्ष दिले पाहिजे.

१४) पंढरपूरातील ओसाड असणाऱ्या जागी वृक्षारोपण करावे.

१५) वाळवंटात स्त्रियांना कपडे बदलण्यासाठी रूमची सोय करण्यात यावी.

१६) चंद्रभागेच्या वाळवंटात शौचालयाची संख्या वाढवावी व पिण्याच्या पाण्यासाठी नळ तयार करावेत.

१७) यात्रा कालावधीत झालेल्या कचऱ्याची व घाणीची ताबडतोब स्वच्छता करावी.

१८) यात्रा कालावधी व यात्रेनंतर स्वच्छता करणाऱ्या कर्मचारी व आरोग्य कर्मचारी यांच्या संख्येत वाढ करावी.

१९) चंद्रभागेच्या वाळवंटात पोलिस मदत केंद्र उभारावे.

२०) पंढरपूर शहरातील पिण्याच्या पाण्याच्या टाकीची स्वच्छाता करावी.

२१) पंढरपूरमधील असलेल्या यमाई तलावातील गाळ काढून त्याचे सुशोभिकरण करावे.

२२) यात्राकाळात मोकाट जनावरांना पकडून कोंडवाड्यात टाकावे.

२३) यात्राकाळात कायमस्वरूपी हॉटेल्स व तात्पुरत्या हॉटेल्समध्ये तयार होणाऱ्या अन्न पदार्थांची तपासणी करावी.

२४) यात्रेपूर्वी शहरातील सर्व महत्त्वाचे रस्ते, प्रदक्षिणा रस्ता, मंदिरा भोवतालचा परिसर इ. मार्गामधील अतिक्रमणे हटवून रस्ते भाविकांसाठी मोकळे करून द्यावेत.

२५) पंढरपूर नगरपालिकेच्या दवाखन्यात आधुनिक सेवा पुरविण्यात याव्यात.

२६) यात्राकाळात भाविकांसाठी तात्पुरती शौचालये निर्माण करावीत.

२७) शहरातील शौचालयाचा मैला भुयारी गटारी मध्ये सोडावी.

२८) शहरातील असलेले अस्वच्छ पाणी वाहून नेऊन त्यावर प्रक्रिया करून त्याचे निर्मळ पाण्यात रूपांतर करण्याची सोय करावी.

२९) शहरातील सर्व भागातील पाण्याचे नमुने तपासावेत.

३०) सरकारने वेळेवर अनुदाने द्यावीत.

३१) पंढरपूर शहर व चंद्रभागा नदीच्या सीमेवरती तटरक्षक भिंत बांधण्यात यावी. जेणेकरून पुराच्या पाण्यापासून शहराचे संरक्षण होईल.

३२) कर्मचारी वर्गाचा सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी त्यांच्यासाठी नगरपालिकेने प्रयत्न करावेत.

३३) कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत कामावर हजर व्हावे यासाठी शिस्त आणण्याच्या दृष्टीने काटेकोर प्रयत्न केले पाहिजेत.

३४) नगरपालिका प्रशासन संचलनालयाने नगरपालिका प्रशासन अधिकाऱ्याची कर्तव्ये विहित केलेली आहेत. त्यानुसार त्यांनी दैनंदिन हजेरी पटाची तपासणी करणे आवश्यक आहे.

३५) कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा वेळो-वेळी घेतला जावा.

३६) वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नोंद घेतली पाहिजे.

३७) खाते प्रमुखांच्या मासिक सभा आयोजित करून कामाचा नियमित आढावा घ्यावा.

३८) कर्मचारी वर्गांना योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, जेणेकरून त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होईल.

३९) कर्मचारी वर्गांना घराची उपलब्धतता नगरपालिकेने करून द्यावी.

४०) नगरपालिकेमध्ये स्वतंत्र अग्निशमन अधिकारी असावा.

४१) यमाई तलावाचे सुशोभिकरण करून पर्यटनाच्या दृष्टीने तळे विकसित करावे.

४२) पंढरपूर शहर विकास आराखड्यातंर्गत नियोजनबद्ध पद्धतीने विकास करावा.

४३) पर्यटनाच्या दृष्टीने 'पंढरपूर शहरामध्ये पर्यटकांना आकृष्ट करेल असे 'श्री विठ्ठल उद्यान' असावे. निसर्ग-सौंदर्याची पंढरीची उणीव अशा पद्धतीने मानवी कल्पकतेने भरून काढणे गरजेचे आहे.